**ठळक बातम्या**

- आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला दिलेल्या आर्थिक मदतीवर पुनर्विचार करावा असं संरक्षण मंत्र्यांचं आवाहन

- पाकिस्तानने दहशतवादी गटांना आर्थिक सहकार्य केल्याची पाकिस्तानच्या संरक्षण मंत्र्यांची कबुली

- चालू आर्थिक वर्षात देशाचा विकासदर सहा पूर्णांक तीन दशांश टक्के राहण्याचा संयुक्त राष्ट्रांच्या अहवालातील अंदाज

- पंजाब नॅशनल बँक घोटाळ्यातील आरोपी निरव मोदी याचा जामीन अर्ज लंडन उच्च न्यायालयाने फेटाळला

**आणि**

- देशाच्या वस्तू आणि सेवा निर्यातीत यंदा १२ टक्क्यांची वाढ झाल्याची वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाची माहिती

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानला दिलेल्या आर्थिक मदतीचा फेरविचार करावा असं आवाहन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केलं. ते आज गुजरातमधल्या भुज इथल्या वायुसेना तळावर जवानांना संबोधित करत होते. नाणेनिधीने दिलेल्या मदतीचा मोठा भाग दहशतवादी कारवायांवर खर्च होण्याची शक्यता असल्याचं त्यांनी सांगितलं. ऑपरेशन सिंदूर मधल्या वायुसेनेच्या कामगिरीची त्यांनी प्रशंसा केली तसंच या प्रतिहल्ल्याचं  देशभरात आणि जागतिक स्तरावर कौतुक होत आहे, असं ते म्हणाले.

पाकिस्तानशी केलेली शस्त्रसंधी म्हणजे लष्करी कारवाईचा पूर्णविराम नसून केवळ अल्पविराम आहे, वारंवार गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारावर जसं पोलीस लक्ष ठेवून असतात त्याचप्रमाणे आम्ही पाकिस्तानवर लक्ष ठेवून आहोत आणि पाकिस्तानने पुन्हा काही आगळीक केल्यास त्याला आपलं सैन्यदल धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही असा इशारा संरक्षण मंत्र्यांनी यावेळी दिला. राजनाथ सिंह आज भारत-पाकिस्तान सीमा प्रदेशालाही भेट देणार आहेत. यावेळी ते भारतीय लष्कराच्या तयारीचं परीक्षण करतील. भारत-पाकिस्तान तणावाच्या वेळी पाकिस्तानं भुज वर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे संरक्षण मंत्र्यांची ही भेट महत्त्वाची मानली जात आहे.

**<><><><><>**

पाकिस्तानने दहशतवादी गटांशी थेट संबंध ठेवून त्यांना आर्थिक सहकार्य केल्याचं पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मुहम्मद आसिफ यांनी एका ब्रिटिश वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत कबूल केलं आहे. पहलगाम मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर ही कबुली देण्यात आल्यामुळे प्रादेशिक अस्थिरतेत पाकिस्तानच्या सहभागाबद्दल चिंता व्यक्त होत आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं लष्कर-ए-तैयबासारख्या दहशतवादी गटांशी पाकिस्तानच्या संबंधांची तपासणी केली आहे. जागतिक पातळीवर पाकिस्तानचं दहशतवादाला खतपाणी घालण्याचं धोरण उघडकीस आणण्यासाठी भारतानं सतत प्रयत्न केले आहेत. हाफिज सईद आणि झाकी-उर रहमान लखवीसह अनेक दहशतवादी पाकिस्तानात आश्रयास असून या व्यक्ती तसंच लष्कर-ए-तैयबा आणि जमात-उद-दावासारख्या संघटना संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या निर्बंध यादीत समाविष्ट झाल्या आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय समुदायानं या मुद्द्याला मान्यता दिली आहे, हे अधोरेखित झालं आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरच्या जम्मू विभागातल्या सध्या बंद असलेल्या सर्व खाजगी आणि सरकारी शाळा येत्या १९ मे रोजी उघडणार असल्याचं जम्मूच्या शालेय शिक्षण संचालनालयानं जाहीर केलं आहे. डोडा, किश्तवार, रियासी आणि रामबन मधल्या शाळा १३ मे पासून सुरु झाल्या होत्या, तर सीमावर्ती जम्मू, सांबा, कठुआ, राजौरी, पूंछ आणि उधमपूरमधल्या अनेक शाळा कालपासून सुरु झाल्या आहेत.

**<><><><><>**

१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेत झोपडपट्टी पुर्नवसन प्राधीकरणानं १०० पैकी ८२ पूर्णांक १६ गुण मिळवून पहिला क्रमांक पटकावला आहे, महावितरणनं दुसरा, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानं तिसरा, महाराष्ट्र ऊर्जा अभिकरणानं चौथा आणि महाराष्ट्र औद्यौगिक विकास महामंडळ- एमआयडीसीनं पाचवा क्रमांक मिळवला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी यासंदर्भात आज घोषणा केली. १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत वेबसाईट सुधारणा, कार्यालयीन सोईसुविधा, स्वच्छता, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस चालना, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी १० मुद्यांवर सर्व शासकीय कार्यालयांमध्ये स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेत शासनाच्या सर्व ९५ महामंडळांनी सहभाग घेतला. महसूली विभागनिहाय सर्वोत्तम तालुका कार्यालयांचा निकाल आज सायंकाळी जाहीर होणार आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याचा सन्मान, आणि शूरवीरांना मानवंदना देण्यासाठी भाजपातर्फे देशभरात तिरंगा यात्रा सुरु आहे. २३ मेपर्यंत ही यात्रा सुरू राहणार आहे. नागपूरमधे  कामठी इथं  आज राज्याचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे  यांच्या उपस्थितीत तिरंगा यात्रा काढण्यात आली. यात्रेच्या सुरुवातीला बावनकुळे यांनी मुख्य चौकात  डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना

मानवंदना दिली. देशातली १४० कोटी आणि महाराष्ट्रातली १४ कोटी जनता ही भारतीय सैन्याच्या पाठीशी आहे, असं ते यावेळी म्हणाले.

**होल्ड ---बाईट बावनकुळे**

**सोलापूर** शहरात देखील आज सकाळी तिरंगा रॅली काढण्यात आली. पालकमंत्री तथा राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते अशोक चौकातल्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून या रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. **लातूर** जिल्ह्यातल्या उदगीर इथंही भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली. उदगीर शहरातल्या छत्रपती शाहू महाराज चौकापासून सुरू झालेल्या या यात्रेचा समारोप शहिद कॅप्टन कृष्णकांत चौकात झाला. जळगाव जिल्ह्यातही तिरंगा यात्रा काढण्यात आली, यावेळी नागरिकांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

**_ होल्ड बाईट**

**<><><><><>**

भारत ही जगातली जलदगतीनं वाढणारी मोठी अर्थव्यवस्था असून चालू आर्थिक वर्षात देशाचा विकासदर सहा पूर्णांक तीन दशांश टक्के राहण्याचा अंदाज संयुक्त राष्ट्रांच्या ताज्या अहवालात वर्तवला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक आर्थिक स्थिती आणि शक्यता याविषयी तयार करण्यात आलेल्या मध्यवर्ती अहवालामध्ये हे निरीक्षण नोंदवण्यात आलं आहे. जागतिक अर्थव्यवस्था सध्या अस्थिर परिस्थितीचा सामना करत आहे. त्यामुळे यामध्ये काहीसा फरक होऊ शकतो, असंही त्यामध्ये नमूद करण्यात आलं आहे. यामध्ये अपेक्षित असलेली वाढ ही खासगी खरेदीदारी आणि सार्वजनिक गुंतवणुकीद्वारे होण्याची शक्यता आहे, असं संयुक्त राष्ट्रांच्या वरिष्ठ अर्थतज्ञ इन्गो पिटरले यांनी सांगितलं. भारताचा विकासदर पुढील वर्षी थोडा वाढून ६ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे.

**<><><><><>**

लंडनमधल्या तुरुंगात असलेला हिरे व्यापारी निरव मोदी याचा जामीन अर्ज लंडन उच्च न्यायालयाने फेटाळला आहे. भारतातल्या पंजाब नॅशनल बँकेतल्या १३ हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्यात सामील असलेल्या निरव मोदी याने त्याच्या प्रत्यार्पणावर निर्णय होईपर्यंत जामीन मिळण्यासाठी लंडन उच्च न्यायालयात काल अर्ज दाखल केला होता. भारतातर्फे काम पाहत असलेल्या वकिलांनी आणि त्यांना साहाय्य करत असलेल्या सीबीआय च्या पथकानं त्यावर जोरदार हरकत घेतली आणि अखेरीस न्यायालयाने तो जामीन अर्ज फेटाळला आहे.

**<><><><><>**

देशाच्या वस्तू आणि सेवा निर्यातीत मागील वर्षीच्या तुलनेत १२ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांची वाढ झाल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं सांगितलं आहे. या वर्षी एप्रिल महिन्यात ७३ अब्ज ८० कोटी डॉलर्सची निर्यात करण्यात आली. मागील वर्षी याच काळात ६५ अब्ज ४८ कोटी डॉलर्स इतकी निर्यात झाली होती. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं संकलित केलेल्या आकडेवारीनुसार, देशाच्या वस्तू निर्यातीत या महिन्यात ९ पूर्णांक ३ शतांश टक्क्यांनी वाढ होऊन ती ३८ अब्ज ४९ कोटी डॉलर्स झाली आहे. एप्रिल मधे देशाची एकूण वस्तू आणि सेवांची आयात ८२ अब्ज ४५ कोटी असून मागील वर्षीच्या तुलनेत ती १५ पूर्णांक ७२ शतांश टक्क्यांनी वाढली आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये कुलगाम आणि पुलवामा जिल्ह्यांत सुरक्षा दलांच्या दोन संयुक्त मोहिमांमधे सहा दहशतवादी ठार झाले. भारतीय लष्कर , केंद्रीय राखीव पोलीस दल आणि पोलिसांनी श्रीनगर इथे घेतलेल्या संयुक्त वार्ताहर परिषदेत आज ही माहिती देण्यात आली.

***//<><><><><>//***